

छाया : नसीर अत्तार.

# शिक्षणमहर्षी व्ही.टी.पाटील यांचा सत्कार

कोल्हापूर,ता.१७–धर्माचे वर्चस्व व पारंपारिक शिक्षण पद्धतीगुळे देशांतील अनेक लोक शिक्षणांपासून वंचित राहिले आहेत. त्या सर्वांना शिक्षणाच्या गंगेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे, असे उद्गार थोर विचारवंत व माजी सहकार मंत्री यशवंतराव मोहिते यांनी आज येथे एका कार्यक्रमात काढले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर होते.

ताराराणी विद्यापीठांचे संस्थापक शिक्षण महर्षी व्ही.टी.पाटील उर्फ काकाजी यांचा नवती महोत्सव नागरी सत्कार समारंभ ताराराणी विद्यापीठाच्या प्रांगणांत श्री. मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला. यावेळी बोलतांना ते पुढे म्हणाले की, समाजाला सध्या मानवतेचे पोषण व मानवी मूल्ये जोपासण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींची जरूरी आहे.युद्धाशिवायचे जग व मानवी मूल्ये यांची जोपासना होण्यासाठी स्त्री शिक्षणांचे प्रयत्न व प्रमाण यांत वाढ झाली पाहिजे.

प्रारंभी श्री. व्ही.टी.पाटील यांचा शाल–श्रीफळ व मानपत्र देऊन यशवंतराव मोहिते यांच्या हस्ते सत्कार करण्यांत आला. सत्कारांस उत्तर देताना व्ही.टी.पाटील म्हणाले की, माझ्या आयुष्यांत अनेक संकटे आली पण सर्वांच्या पुण्याईने त्यातून निभावून जाण्यांत आपण यशस्वी झालो. ताराराणी महिला विद्यापीठांचे आपले स्वप्न, वास्तवांत येण्यासाठी समाजांतील सर्वांचे सहकार्य हवे. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्तविक रा.कृ.कणबरकर यांनी केले तर प्रमुख पाहुणे श्री. मोहिते यांची ओळख उद्योगपती मदन मोहन लोहिया यांनी करून दिली. मानपत्रांचे वाचन डॉ. अंबादास माडगुळकर यांनी केले तर बेळगांवचे उद्योगपती बा.म.गोगटे यांनी ताराराणी महिला विद्यापीठसाठी १० हजार रू. ची मदत जाहीर केली. व्ही.टी.पाटील यांच्या अर्धपुतळयाचे अनावरण श्री. मोहिते यांच्या हस्ते करण्यांत आले. कार्यक्रमांच्या शेवटी समाजातील विविध संस्था व नागरिक यांनी व्ही. टी. पाटील यांना पुष्पहार घालून शुभेच्छा दिल्या.

दै. सत्यवादी ता.१८/१/१९९० पान नं. ३